दैनिक लोकमत
वाचकांच्या पहिल्या पसंतीचे मराठी राष्ट्रीय दैनिक
गुरुवार दि. २३ सप्टेंबर २००४ पृष्ठे : १२ किंमत - रु. १.५० मुंबई

लोकमत मुंबई ◆ गुरुवार, दि. २३ सप्टेंबर २००४



# ज्योतिषशास्त्र अभ्यास वर्गातील विद्यार्थ्यांचा सत्कार


तुषार सावडावकर, कवीवर्य मंगेश पाडगावकर आणि प्रदीप जोशी.

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) - पायरावास्तू तज्ज्ञ तुषार यशवंत सावडावकर संचालित कृष्णमूर्ती ज्योतिष विद्यालय व पायरावास्तू रिसर्च फाऊंडेशन (डोंबिवली) या संस्थेतर्फे ठाणे व परळ येथे घेण्यात आलेल्या ज्योतिष व वास्तूशास्त्र वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कवीवर्य मंगेश पाडगावकर व वेदमूर्ती प्रदीप जोशी यांच उपस्थितीत नुकताच पार पडला. यात ज्योतिषशास्त्रात विक्रोळी येथील वसंत मुळम यांना तर वास्तूशास्त्रात नीलिमा पंडित (ठाणे) यांना सुवर्णपदक देण्यात आले. त्या वेळी सहायक पोलीस निरीक्षक कैलास चव्हाण, मिलिंद इडेकर, सल्लागार चंद्रशेखर श्रीखंडे, रवींद्र करमळकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमांगिनी तुषार सावडावकर यांनी केले.